शिवाजी विद्यापीठ मराठी शिक्षक संघ, कोल्हापूर
विद्वत्प्रमाणित, यू.जी.सी. मान्यताप्राप्त त्रैमासिक
(Peer Reviewed Referred Research Journal)
ISSN No. 2319-6025

# शिविम संशोधन पत्रिका

वर्ष-नववे : जोडअंक-एकवीस आणि बावीस : जानेवारी ते जून २०२०

## मध्ययुगीन मराठी वाङ्मयातील विविध संप्रदाय

दिनांक १ व २ फेब्रुवारी, २०२०



## सद्गुरु गाडगे महाराज कॉलेज, कराड

(स्वायत्त महाविद्यालय)
ता. कराड जि. सातारा
राष्ट्रीय उच्चस्तर शिक्षा अभियान (रुसा)

* महानुभाव तत्त्वज्ञानाची कालसापेक्षता
डॉ. सागर लटके ७०
* महानुभाव संप्रदाय : आचार धर्म
डॉ.सिंधू आवळे ७६
* महानुभाव संप्रदायाचे तत्त्वज्ञान
डॉ. कोमल कुंदप ७८
* महानुभावीय आचारधर्माची तत्कालीन गरज
प्रा. मोहन चव्हाण ८२
* महानुभाव तत्त्वज्ञान आणि चक्रधर वचनामृत : सौंदर्यात्मक विचार
प्रा.गुंडोपंत पाटील ८५
* महानुभाव साहित्य : मध्ययुगीन मराठीचा मानदंड
डॉ.गवराम पोटे ९०
* महानुभाव संप्रदायाचा आचारधर्म
डॉ. नंदिनी काळे ९३
* चक्रधरांची समता : मनुष्यत्त्वाचा गौरव करणारी
डॉ.प्रशांत गायकवाड ९७
* महानुभाव पंथ व श्री चक्रधर स्वामींचे तत्त्वज्ञान
जयश्री बाबर १०१
* श्री चक्रधर स्वामी यांचा उपदेश आणि राष्ट्रीय एकात्मता
प्रा.प्रेरणा चव्हाण १०४
* चरित्रकार म्हाइंभट्ट व चरित्रकार संत नामदेव : तुलनात्मक अभ्यास
डॉ. सुवर्णा पाटील १०७
* महानुभाव संप्रदायातील महदंबेची भूमिका
डॉ.विनोद राठोड १११
* आद्य मराठी कवयित्री महदंबाः व्यक्ती व साहित्य कृती
डॉ.शकुंतला पिसाळ ११५
* मध्ययुगीन भक्ती साहित्य : भक्ती साहित्यातील महादाईसाचे योगदान
डॉ. सौ. नंदिनी रणखांबे, प्रा. नेताजी सूर्यवंशी ११८
* वारकरी संप्रदायाचे स्वरुप
डॉ. हणमंत पोळ १२१
* भागवत धर्मः एक समाजप्रबोधनपर विचारधारा
डॉ. मानसी लाटकर, १२५
* वारकरी संप्रदायःस्वरुप आणि तत्त्वज्ञान
जयश्री शिंदे-गायकवाड १३०
* वारकरी संप्रदायाचा जनसामान्यावरील प्रभाव
डॉ.प्रकाश हुलेनवर १३३
* वारकरी संप्रदायाचा आचारधर्म
डॉ. प्राजक्ता निकम १३६

झाडही फुलाफळांनी बहरलेले नसावे. याचा अर्थ एखादे ठिकाणही मनात विकार निर्माण करू शकतात.

* आचारधर्माचे म्हणजे 'असतीपरी' चे चौथे व महत्त्वाचे वचन देवतास्मरण होय. उपरोक्त म्हणजे विकारविकल्प शून्यत्त्व, स्वभावमात्रे, निरालंबी ही वचने विधिनिषेध स्वरूपाची असून केवळ तेवढेच आचारधर्म पाळून परमेश्वराची प्राप्ती होणार नाही तर परमेश्वरप्राप्तीसाठी त्याचे नित्य स्मरण अवश्य ठरते आणि परमेश्वराचे स्मरण म्हणजे प्रपंचाचे विस्मरण होय.

''जेतुळा जेतुळा प्रपंची जडे, तेतुळा तेतुळा इश्वरी उजडे

जेतुळा जेतुळा प्रपंची उजडे, तेतुळा तेतुळा इश्वरी जडे:''म्हणजे साधकाने निरस, निराश्रय असले पाहिजे.

* जन्मक्षेपी हे असती परी किंवा आचारधर्माचे पाचवे व अत्यंत महत्त्वाचे सूत्र. जन्म म्हणजे आयुष्य आणि क्षेपणे म्हणजे घालविणे. कंठणे. महानुभावीत साधकांनी आपले आयुष्य विकार विकल्पशून्य होऊन स्वभाव नियमन करून, निरालंबी राहून व परमेश्वराचे अखंड स्मरण करीत कंठावे अशा रितीने जो कुणी आयुष्य घालवेल त्याला परमेश्वराचा योग घडून त्याचा उद्धार होतो. असे सांगितले आहे, जन्मक्षेपणाचा अर्थ डॉ.कोलते यांच्या मते ''शारीरिक कष्ट व मानसिक दुःख करीत आपले अनुसरणानंतरचे सर्व आयुष्य परमेश्वरार्पण करावे.'' असा करतात.

श्रीचक्रधरांनी साधकाला अटल, विजन, भिक्षाव्रत, युक्ताहार इ. जे नियम घालून दिले आहेत त्याचे पालन करण्यात देहाला कष्ट आहेतच परंतु मानसिक दुःख म्हणजे परमेश्वर प्राप्तीची तळमळ हे आहे.

थोडक्यात, साधकाने जन्मजिवीत परमेश्वराला द्यावे. महानुभावीत आचारधर्मामध्ये शारीरिक कष्ट व मानसिक दुःख करीत परमेश्वरप्राप्ती हेच साध्य जपावे त्याचा विसर पडू देऊ नये.

**संदर्भ**

१. तुळपुळे शं.गो. – महानुभाव पंथ आणि त्याचे वाङ्मय – व्हीनस प्रकाशन, पुणे, आवृत्ती पहिली

२. नसिराबादकर ल.रा. – प्राचीन मराठी वाङ्मयाचा इतिहास – फडके प्रकाशन, कोल्हापूर, आवृत्ती सातवी.

* * * * * *

# महानुभाव संप्रदाय : आचार धर्म

**डॉ.सिंधु आवळे**
राजर्षी छत्रपती शाहू कॉलेज, कोल्हापूर

प्रत्येक धर्म आचारप्रधान असतो. महानुभाव पंथ साधकांचा असल्याने पंथातील नियम आणि त्याचे पालनही अत्यंत कडक होते. या आचारधर्मामध्ये संन्यस्त आणि गृहस्थ असे दोन शिष्याचे वर्ग होते. महानुभावाचा आचारधर्म या दोन प्रकारांमधून व्यक्त होतो. यालाच 'असती परी' असे म्हणतात. असती परी म्हणजे 'असण्याची किंवा राहण्याची रीत.'

* या आचारधर्माचे विकार विकल्प शून्यत्व हे पहिले लक्षण आहे. विकार आणि विकल्प यात भेद मानला आहे. विकार हा इंद्रियधर्म असून विकल्प हा मनोधर्म आहे. साधकांने सर्व लहानमोठ्या विकारांना तिलांजली दिली पाहिजे. 'हाती काडी धरिजे हा ही आदि करूनि एकु विकारूचि की गा' असे चक्रधरांनी वचन सांगितले आहे. अर्थात साधकांनी विकारशून्य झाले पाहिजे. विकारशून्य होण्याचे मुख्य साधन म्हणजे वैराग्य यात दिखाऊ वैराग्य उपयोगाचे नाही. वैराग्यामध्ये त्याग सर्वसंगपरित्यागाला अनन्यसाधारण महत्त्व आहे.
* स्वभावमात्रे हे आचारधर्माचे दुसरे लक्षण आहे. स्वभाव म्हणजे देहधर्म. ते एकूण आठ आहेत. क्षुधा, पिपासा, मल, मूत्र, शीत, उष्ण, भय, निद्रा हे सर्व जन्मजात असतात. ते सर्वस्वी त्यागता येत नाही. क्षुधा ही अष्टविध स्वभावाचे मूळ आहे. अर्थात रसना. या रसनेला नियमन केले की सर्व स्वभाव आपोआप रोधले जातात. त्यामुळे जगण्यापुरता आहार म्हणजे युक्ताहार हे मुख्य सूत्र आहे.

'भिक्षाव्रत' हे ही महानुभावानी मांडले आहे. त्यामध्ये भिक्षा केव्हा, कोठे, कधी, कोणत्या वृत्तीने मागावी याविषयी सांगताना भिक्षा मागताना घर निवडू नये, तोरण मंडळाचे या घरी भिक्षा मागू नये, अवश्य असेल तितकेच मागावे, एकही शीत वाया जाऊ देऊ नये, भिक्षेला सुद्धा चवीने न खाता काला करून खावे. म्हणजे चवबेचव हा संदर्भच राहत नाही. यावरून फक्त भूक भागविणे आणि फक्त पोटाची खळगी भरणे हाच हेतू असावा.

वस्त्रप्रावरणाच्या संदर्भातही साधकांसाठी काही नियम होते. फक्त शरीराचे संरक्षण, शीत आणि उष्ण यासाठी वापरण्यात येणारी वस्त्रे, वस्त्रेही नवीकोरी, तलम नसावीत, तर जाडेभरडे, जीर्ण, मलीत असावे. याचा अर्थ साधकाने शरीराचा थाटमाट करू नये. त्याने रंगीबेरंगी वस्त्रे टाळावीत. कारण रंगीबेरंगीपणा हा सुद्धा एक विकारच आहे आणि ही वस्त्रे साधकांनी स्मशानातून मिळवावी. असाही दंडक होता.

* निरालंबी हे आचारधर्माचे तिसरे सूत्र आहे. साधकाने अंतर्बाह्य नि:संग, निराश्रितपणे असावे. साधकाने आपणास ओळखणाऱ्या ठिकाणी राहू नये, कोणा एका स्थानाची सवय लावून घेऊ नये. एखाद्या गावात वस्ती अशी रात्रीपुरतीच करावी. भ्रमंती करीत असताना तात्पुरता आश्रय एखाद्या झाडाच्या किंवा देवळातील कोपऱ्यात घ्यावा. ते